महारेशीम अभियान-२०२६
तुती/टसर क्षेत्र नोंदणी कार्यक्रम राबविणेस मुदतवाढ देणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-सपववि-४००१२/९/२०२६-DESKSERICULTURE-CMTD**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: २० मार्च, २०२६.

**वाचा:-**

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक : धोरण २०१७/ प्र.क्र.६/टेक्स-५. दि.१५.०२.२०१८.

२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, क्रमांक : केंपूयो २०१७/प्र.क्र.७/रेशीम कक्ष दि.०६.०३.२०१७.

३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक: प्रावियो-१०१८/ प्र.क्र.११८/रेशीम कक्ष, दि.१२.१२.२०१८.

४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक धोरण २०२३/ प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.०२.०६.२०२३.

५) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक सपववि-४००१२/९/२०२६-DESKSERICULTURE-CMTD, दि.०४.०२.२०२६.

६)संचालक (रेशीम) यांचे पत्र क्रमांक, रेशीम/कार्या-०८/महारेशीम अभि-२०२६/ राबविणे/मुदतवाढ/२०२५-२६/२३५ दि.०६.०३.२०२६.

**प्रस्तावना:**

राज्याचे एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ हे संदर्भाधीन दि.०२ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे जाहीर करण्यात आले आहे. रेशीम उद्योग हा कृषि व वन संपत्तीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे. महाराष्ट्रातील हवामान या उद्योगास पोषक असल्यामुळे रेशीम उत्पादन करण्यास राज्यात भरपूर वाव आहे. राज्याचा कृषि विकास दर वृध्दीबरोबर ग्रामीण भागातील जनतेचा आर्थिकस्तर व जीवनमान उंचावण्यास मदत करणारा हा उद्योग आहे. रेशीम शेतीतून मिळणारे हमखास व नियमीत उत्पन्न पाहता क्षेत्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात मागणी आहे, ही बाब लक्षात घेऊन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ या वस्त्रोद्योग धोरण कालावधीत रेशीम उद्योगाला राज्याच्या अर्थव्यवस्थेत केंद्रस्थानी आणण्यासाठी अनेक उपाययोजना हाती घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यास अनुसरून नवीन तुती लागवड व टसर उद्योग करण्यासाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्याकरिता दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे व इतर संस्थेच्या सहकार्याने महारेशीम अभियान राबविण्यात येईल असे वस्त्रोद्योग धोरणात नमूद आहे. तसेच, क्षेत्रीय स्तरावरून प्राप्त मागणीच्या अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेंतर्गत रेशीम विकास योजना रेशीम संचालनालयासह, कृषी विभाग व ग्रामविकास विभाग यांच्यामार्फत राबविण्याबाबत नियोजन विभाग शासन निर्णय दि. ६ सप्टेंबर, २०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यामुळे रेशीम शेती उद्योग व योजनेची माहिती शेतकरी व उद्योजकांपर्यंत पोहचविण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी सन २०१७ पासून महारेशीम अभियान राज्यात राबविण्यात येत आहे. महारेशीम अभियानास शेतकऱ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून रेशीम शेतीचा प्रचार व प्रसिध्दी होवून रेशीम उद्योग लोकाभिमुख होण्यास मदत मिळाली आहे. त्या अनुषंगाने संचालक (रेशीम) यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सन २०२६ मध्ये तुती लागवड व टसर रेशीम लाभार्थ्यांची नाव नोंदणी करण्यासाठी दि. ४ फेब्रुवारी २०२६ पासून ते दि. ११ मार्च २०२६ या कालावधीत "महारेशीम अभियान-२०२६" राबविण्यास संदर्भाधीन दि.०४.०२.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

तथापि सदर अभियान कालावधीत मनरेगा योजने अंतर्गत कंत्राटी कर्मचारी दि.२७.०१.२०२६ ते दि.१२.०२.२०२६. पर्यंत संपावर असल्याने तसेच संचालनालयांतर्गत संपुर्ण राज्यभरात अत्यल्प तांत्रीक कर्मचारी आस्थापनेवर असल्याने त्यांना अभियानाव्यतीरीक्त शेतक-यांना तांत्रीक मार्गदर्शन करणे, अंडीपुंज मागणी व पुरवठा करणे, क्षेत्रीय भेटी देणे, कार्यालयीन नियमित कामे करणे मनरेगा अंतर्गत मस्टर संबंधातील सपूर्ण कामकाज वेळेत करणे गरजेचे असून ऑनलाईन तुती लागवडीसाठी नाव नोंदणी करणे करीता तांत्रीक अडचणी येत असल्याने **"महारेशीम अभियान २०२६"** राबवितांना लक्षांक पुर्ततेवर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे दिसुन येत आहे.

सबब राज्याचा निर्धारीत लक्षांक साध्य करणे करीता राज्यभरात मोठया प्रमाणात नवीन तुती लागवड नाव नोंदणी शिबीरे नियोजीत केलेले असल्याने **"महारेशीम अभियान २०२६"** राबविणेस मुदतवाढ देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

राज्यातील रेशीम शेतीचे महत्व व त्यातून मिळणाऱ्या हमखास व शाश्वत उत्पन्नाची शेतकऱ्यांना माहिती व्हावी याकरिता प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी तसेच, सन २०२६ मध्ये तुती लागवड व टसर रेशीम लाभार्थ्यांची नाव नोंदणी करण्यासाठी बीड, जालना, नांदेड, हिंगोली, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलढाणा, नागपुर, वर्धा, चंद्रपुर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर, पालघर,रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराधीव व लातूर या जिल्हयांमध्ये "महारेशीम अभियान-२०२६" राबविण्यास दि.०५.०४.२०२६ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. "महारेशीम अभियान-२०२६" राबविण्यासाठी संदर्भाधीन दि.१२ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे गठीत केलेल्या समित्या, अभियान राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दती जशास तशा लागू राहतील.

३. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत रेशीम संचालनालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा आपले सरकार पोर्टलवर जनतेकरिता उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्यास अभियान कालावधीत व्यापक प्रमाणात प्रसिध्दी व जनजागृती करण्यात यावी. तसेच, नवीन शेतकरी/उद्योजक नोंदणी आपले सरकार पोर्टलवर करण्याबाबत सर्व संबधित क्षेत्रिय कार्यालयास अवगत करण्यात यावे.

४. राज्यात जिल्हा परिषद / पंचायत समिती / स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणूका असल्यास महारेशीम अभियान-२०२६ राबविताना आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही यांची दक्षता क्षेत्रीय अधिकारी व अंमलबजावणी यंत्रणांनी घ्यावी.

५. सदर महारेशीम अभियानाकरिता आवश्यक निधी विविध मंजूर योजनामधील प्रशिक्षण, मेळावे, प्रचार व प्रसिध्दी या बाबींकरिता उपलब्ध असलेल्या निधीतून विहीत मर्यादेच्या व वित्तीय अधिकार नियमाच्या अधिन राहून खर्च करण्याची जबाबदारी संचालक (रेशीम) यांची राहील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळाबर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२०१२२३०२१७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PAWAR TUSHAR PITAMBAR
Date: 2026.03.20 12:23:53 +05'30'

**( डॉ.तुषार पवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
३) महाराष्ट्रातील सर्व सन्माननीय संसद सदस्य,
४) महाराष्ट्रातील सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद सदस्य,
५) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (ग्रामविकास), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) संचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सचिव (रोहयो), मंत्रालय, मुंबई
१२) सर्व विभागीय आयुक्त,
१३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.राज्य, नागपूर
१४) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७) संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर
१८) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
१९) प्रकल्प संचालक, समतादूत कक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
२०) सर्व उप संचालक/सहायक संचालक (रेशीम), नागपूर/ अमरावती/ पुणे / छत्रपती संभाजीनगर
२१) सर्व रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१/२, जिल्हा रेशीम कार्यालय
२२) विधानमंडळ ग्रंथालय, विधानभवन मुंबई
२३) रेशीम कक्ष निवडनस्ती.

***************